# तामसिक इंग्रजीच्या तुलनेत सात्त्विक मराठी भाषा श्रेष्ठ !

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण विषय '*' या चिन्हाने दर्शवले आहेत.)


- मनोगत ४
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ५

१. महत्त्व ६
 * मराठी भाषा जगातील दहा प्रमुख भाषांपैकी एक असणे ६
२. वैशिष्ट्ये ६
३. संतांनी मराठी भाषा समृद्ध व वैभवशाली करणे ८
४. लाभ १०
५. व्याकरण, शुद्धलेखन आणि हस्ताक्षर १०
 * महत्त्व १०
 * व्याकरणाच्या नियमांत फेरफार करणारे वैयाकरणी १२
 * एका शब्दापासून वेगवेगळ्या अर्थाचे अनेक शब्द व वाक्ये बनणे १८
 * अनेक अर्थ होणारे काही शब्द २०
 * अर्थाचा अनर्थ घडविणारी वाक्ये ३१
 * उच्चारानुरूप अर्थ पालटणारी वाक्ये ३२
 * 'करायचे एक व बोलायचे दुसरे !', अशा प्रकारची वाक्ये ३२
६. मराठी व इतर भाषा ३३
 * इंग्रजी व मराठी ३३
 * पाश्चात्त्य भाषांची मर्यादा ३३
 * इंग्रजीमुळे होणारा वाईट शक्तींचा त्रास ४३
७. अनुभूती ४४
८. सूक्ष्मातील प्रयोग ४६

९. काही भाषांतील लिखाण वाचल्यावर होणारे परिणाम व अनुभूती ४७
१०. इंग्रजी, हिंदी व मराठी या भाषांतील वार्तालापांचे
ध्वनीचित्रीकरण करतांना होणारे त्रास ४७

# मनोगत

आम्ही साधना करत असल्यामुळे प्रत्येक गोष्टीकडे अध्यात्माशी संबंधित त्रासदायक स्पंदने, तसेच चैतन्य, आनंद, शांती अशा अनुभूतींच्या दृष्टीकोनांतून पहातो. म्हणूनच या ग्रंथात मराठीविषयी लिहितांनाही भावनेच्या स्तरावर काही न लिहिता अध्यात्माच्या स्तरावर लिहिले आहे. संस्कृतनंतर मराठी हीच सर्व भाषांत सर्वाधिक सात्त्विक भाषा असल्याचे सूक्ष्मातील अनेक प्रयोगांत परत परत सिद्ध झाल्याने 'मानवजातीसाठी ही सात्त्विक भाषा टिकवण्यासाठी प्रयत्न करणे', हा आमच्या समष्टी साधनेचाच एक भाग समजतो. साधनेने व सूक्ष्मातील प्रयोगांमुळे आम्हाला मराठी भाषेचे महत्त्व कळले असले, तरी ते बहुसंख्य मराठी माणसांना त्या माध्यमांतून कळणार नाही. त्यांना मराठी भाषेचे महत्त्व त्यांच्या बुद्धीला समजेल, अशा शब्दांतच सांगणे आवश्यक आहे. या हेतूने हा ग्रंथ संकलित केला आहे. यापुढील भागात म्हणजे 'मराठी भाषेची सात्त्विकता स्पष्ट करणारे ज्ञान व सूक्ष्म-चित्रे' या ग्रंथात मराठीविषयी ईश्वरी कृपेमुळे मिळालेल्या दिव्य ज्ञानाचा समावेश केला आहे.

प्रस्तूत ग्रंथात मराठीचे महत्त्व व वैशिष्ट्ये, मराठीला समृद्ध आणि वैभवशाली करण्याचे संतांचे कर्तृत्व इत्यादी विषयांचे ज्ञान (माहिती) दिले आहे. तसेच शुद्ध मराठी भाषेची आवश्यकता लक्षात यावी, म्हणून मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावरील काही शासकीय फलकांवरील अशुद्ध मराठीची उदाहरणेही दिली आहेत. मराठी भाषेची सात्त्विकता टिकवून ठेवायची असेल, तर त्यातील व्याकरण, शुद्धलेखन तसेच हस्ताक्षर यांनाही पुष्कळ महत्त्व आहे. त्याचाही उहापोह या ग्रंथात केला आहे. स्वभाषाभिमान जोपासणाऱ्या या ग्रंथमालिकेतील अन्य काही भागांची विज्ञापने (जाहिराती) ग्रंथाच्या शेवटी दिली आहेत.

संस्कृतनंतर सर्वाधिक सात्त्विक असलेली मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी हा ग्रंथ वाचून कडेला (बाजूला) ठेवण्यापेक्षा 'मला यासंदर्भात काय करता येईल', याचा विचार करून काहीजण कृतीप्रवण झाले, तर या ग्रंथाचे लिखाण करणे सार्थकी लागले, असे होईल. हा ग्रंथ वाचून जास्तीतजास्त जणांना मराठी भाषेची सात्त्विकता आणि चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यास स्फूर्ती मिळो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**